# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### हिंगोली जिल्ह्यातील कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या ठिंबक व तुषार सिंचन योजनेच्या अनुदानाबाबत

**(१) ५६५२ (०७-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या ठिंबक व तुषार सिंचन योजनेच्या अनुदानापेटी मागील वर्षीच्या १० कोटी रुपयांच्या निधीपैंकी अद्यापही शेतकरी उर्वरित ४ कोटी ८२ लाख रुपयांच्या निधीची प्रतिक्षा करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उर्वरित निधी शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-११-२०१५) :** (१), (२) व (३) सन २०१४-१५ या वर्षासाठी हिंगोली जिल्ह्यास सुक्ष्मसिंचनाच्या अनुदानासाठी आवश्यक असलेला रु. ९.४५ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळमनुरी येथील मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्याक तरुणांना रोजगारासाठी कर्ज मंजूर करण्याबाबत**

**(२) ५६६८ (०८-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी येथील मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्याक तरुणांना रोजगारासाठी कर्ज प्रकरण मंजूर करुन तीन महिने उलटले तरी अद्यापपर्यंत कर्ज न मिळाल्याने अनेक युवक बेरोजगार झाले असून हे कर्ज तात्काळ वाटप करावे अशी मागणी बेरोजगार युवकांकडून होत असल्याचे दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेरोजगार युवकांच्या या मागणीवर शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-१०-२०१५) :** (१) होय.

तहसिलदार, कळमनुरी यांच्यामार्फत दिनांक २३.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये व जिल्हाधिकारी कार्यायल, हिंगोली यांच्यामार्फत दिनांक ३०.१२.२०१४ रोजीच्या पत्रासोबत अशा आशयाची निवेदने या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(२) व (३) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राज्यातील अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी थेट कर्ज योजना, मुदत कर्ज योजना व सुक्ष्म पतपुरवठा योजना या योजना राबविण्यात येत असून सदरील योजनेअंतर्गत लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन निवड झालेल्या लाभार्थ्यांना कर्जाची रक्कम संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये NEFT द्वारे जमा करण्यात आली असून ज्या लाभार्थ्याच्या प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत अशा लाभार्थ्यांच्या प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करुन संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर कर्जाची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. हिंगोली जिल्हयामध्ये थेट कर्ज योजनेअंतर्गत आतापर्यंत ४५ लाभार्थ्यांना रु. १८.०० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आली. त्यापैकी कळमनूरी येथील ३२ लाभार्थ्यांना रु. १२.८० लाख इतकी रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी निधी देण्याबाबत**

**(३) ५८७७ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी देण्यात यावयाच्या १०० कोटी रुपयांच्या निधीसाठी राज्य शासन हमी देणार असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजतागायत मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातर्फे वितरीत करण्यात आलेल्या कर्जापैकी किती कर्जाची परतफेड महामंडळाकडे झाली आहे,
(३) असल्यास, उर्वरित कर्जाच्या वसुलीकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) :**(१) नाही.
(२) राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवंम वित्त निगम, नवी दिल्ली यांच्यामार्फत महामंडळास आतापर्यंत रु ७२.३४ कोटी इतके कर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी महामंडळाने मार्च, २०१५ पर्यंत रु. ४४.३३ कोटी इतके परत केले असून रु. २८.०१ कोटी शिल्लक आहेत. राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवंम वित्त निगम, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड नियमितपणे त्रैमासिक हप्त्यामध्ये त्यांच्या मागणीपत्रानुसार (Demand Notice) नुसार करण्यात येत आहे.
(३) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या सर्व कर्ज योजनेअंतर्गत कर्ज वसुलबाबतचे आगाऊ दिनांकित धनादेश (PDC) घेण्यात येतात. सदरील PDC विहित दिनांकास जिल्हा स्तरावरील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये जमा करण्यात येतात. ज्या लाभार्थ्याच्या खात्यामध्ये पुरेशी कर्जाबाबतची रक्कम शिल्लक नसल्यामुळे ज्या PDC धनादेशांचे अनादर (बाऊन्स) होतात अशा लाभार्थ्यांना निगोशिएबल इन्स्ट्रयमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत कारवाई करण्यासाठी सन्मा. संचालक मंडळाच्या दिनांक ०७ जानेवारी, २०१५ रोजीच्या ८३ व्या बैठकीमध्ये एखाद्या कायदेशीर फर्मला किंवा सल्लागारांना जाहिरात देऊन नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कर्ज वसुलीसाठी कायदेशीर सल्लागारांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
जिल्हा कार्यालयास ज्या लाभार्थ्यांचे कर्ज वसुलीबाबतचे धनादेश अनादर (बाऊन्स) होतात अशा लाभार्थ्यांना व त्यांच्या जामीनदारांना सूचना देण्याबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे वसुलीमध्ये निश्चितच वाढ होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकात अनेक गैरसोयीबाबत

**(४) ६०६९ (०७-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथे राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकात अनेक गैरसोयी असून बसस्थानकात विजेचे दिवे नाहीत, प्रवाश्यांना निवा-याची सोय नाही, पिण्याच्या पाण्याची सोय नाही त्यामुळे प्रवाश यांना त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) मोहोळ येथील बसस्थानक सुसज्ज अद्ययावत व सर्व सोयीयुक्त करण्याची तत्कालीन लोकप्रतिनिधींनी घोषणा करुन त्यासाठी ८० लाख रुपयांचा निधीसुध्दा देण्याची घोषणा केली, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, त्या निधीतून बसस्थानकाच कोणती कामे करण्यात आली,

(४) सदर निधी प्राप्त झाला नसल्यास, शासनाने या कामासाठी निधी देऊन बसस्थानक सुसज्य करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) शासनाकडून सन २०१२-१३ सर्व साधारण योजनेमधून मोहोळ बसस्थानकाची पुनर्बांधणी करण्याकरीता रु.४६ लक्ष इतका निधी महामंडळास प्राप्त झाला. सदर निधीमधून (१) बसस्थानक इमारत बांधणे त्यामध्ये ३ गाळे प्रतिक्षालय, १ गाळा उपहारगृह, १ गाळा पार्सल व वाहतूक नियंत्रणकक्ष व १ गाळ्यात चालक/वाहक विश्रांतीगृह (२) भूमिगत पाण्याची टाकी पंपरुमसह बांधणे (३) वाहनतळ भरावीकरण (४) वाहनतळाचे कठीणीकरण (५) दगडी कुंपणभिंत (६) सांडपाणी व्यवस्था (७) पाणी पुरवठा व्यवस्था (८) विद्युत कामे इ. कामे केली आहेत.

सद्यस्थितीत बसस्थानकात विजेच्या दिव्यांची व्यवस्था, प्रवाशांना बसण्यासाठी प्रतिक्षालय आसन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वाणिज्य आस्थापना, उपहारगृह, वाहतूक नियंत्रण कक्ष, तिकिट आरक्षण व्यवस्था, विद्यार्थ्यांना पासेस देण्याची व्यवस्था, पुरुष व महिलांकरीता प्रसाधनगृहांची व्यवस्था इ. सुविधा आहे. स्वच्छतागृहाची सोय वेगळ्या इमारतीत असून त्यामध्ये पुरुषांकरीता ४ संडास, २ बाथरुम, २ मुताऱ्या तर स्त्रियांसाठी २ संडास व २ बाथरुमची सोय आहे.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तसेच उपविभागात अल्पसंख्यांक लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दीष्ट व लक्षांक निश्चित करण्याबातची मागणी**

**(५) ७७७४ (०८-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तसेच उपविभागात अल्पसंख्यांक लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दीष्ट व लक्षांक निश्चित करण्याच्या मागणीबाबत अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, तसेच विकासासंदर्भात कार्य करणाऱ्या विविध जनप्रतिनिधी, सेवाभावी संस्थांनी विशेषतः समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, वित्त व नियोजन मंत्री, राज्यमंत्री अल्पसंख्यांक विकास, प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि ऑगस्ट, २०१४ वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्णय देण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाच स्वरुप व व्यक्ती तसेच प्राथीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या थेट कर्ज योजना, मुदत कर्ज योजनेअंतर्गत राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दिष्टे निश्चित करण्यात आली असून लॉटरी पध्दतीचा अवलंब करुन लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना कर्जाची रक्कम मंजूर करुन वितरीत करण्यात येते.

सन २००१ मधील जणगणनेनुसार राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अल्पसंख्यांक लोकसंख्येची संख्या, टक्केवारी त्यानुसार महामंडळामार्फत राबविण्यात येणारी थेट कर्ज योजना व मुदत कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या व ठरवून दिलेले उद्दिष्टनुसार कर्ज वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील महाराष्ट्र ज्ञानप्रबोधनीची कार्यालयीन जागा भाडेतत्वावर वितरीत करण्याबाबत

**(६) ७७७५ (०८-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील महाराष्ट्र ज्ञानप्रबोधनीची कार्यालयीन जागा भाडेतत्त्वावर वितरीत करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक लोकप्रतिनिधी समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री, मा.वित्त व नियोजन मंत्री तसेच मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) राज्यमंत्री अल्पसंख्यांक विकास, प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास आणि प्रधान सचिव, तंत्र शिक्षण विभागाकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ रोजी व माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण एसटी आगाराच्या एसटी बंद पडण्याच्या प्रकारामुळे प्रवाशांचे हाल होत असल्याबाबत**

**(७) ८४२५ (०४-०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण एसटी आगाराच्या एसटी बंद पडण्याच्या प्रकारामुळे येथील ग्रामीण भागातील प्रवाशांचे हाल होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) ६ मिनी बस कल्याण-आगाराच्या २०११ मध्ये ताफ्यात असून या बसची दयनीय अवस्था असल्यामुळे या बस कोठेही बंद पडतात, हे खरे आहे काय,
(३) केडीएमटी मध्ये काम करणारे तिकीट तपासणीय कामगार न जाताच मदतनीसाच्या मदतीने दिवस भरल्याचा दाखवत आहेत, हे खरे आहे काय,
(४) केडीएमटी ने नेमलेल्या ९ सहायक वाहतुक निरीक्षक व ७ असिस्टंट असे एकूण १६ कर्मचाऱ्यांनी गेल्या ११ महिन्यात अवघी रुपये ३,०६,१७०/- वसूली केली आहे, हे खरे आहे काय,
(५) काढलेल्या तिकीटाचे पैसे परत देण्यासाठी पर्यायी व्यवस्थेत विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

कल्याण आगारात एकूण ६४ नियते असून त्यासाठी ७२ गाड्या चालनात आहेत. त्यापैकी मिनी बसेसची ४ नियते असून त्याकरीता ५ मिनी बसेस उपलब्ध आहेत. आगारात नियतांपेक्षा अधिक गाड्या असून वाहनांची कमतरता नाही.

तसेच बसेसची नियमित, दैनिक, दशदिनीय, त्रैमासिक अद्यावतीकरण (डॉकींग) इत्यादी देखभालीची कामे वेळच्या वेळी करण्यात येतात. गेल्या तीन वर्षात एकूण १७ नवीन बसेस कल्याण आगारात देण्यात आलेल्या आहेत व जुन्या झालेल्या एकूण ७ बसेस मोडित काढण्यात आलेल्या आहेत.

(३) सदर प्रकरणी के.डी.एम.टी. मधील सर्व संबंधित सहाय्यक वाहतूक निरीक्षक यांना त्यांचे नावे वितरीत केलेल्या दंडवसूली पावती पुस्तकांमध्ये मदतनिसांच्या स्वाक्षरीने दंड वसूली पावत्या वितरीत केल्यामुळे व इतर मुद्दयांबाबत संबंधित सहाय्यक वाहतूक निरीक्षकांच्या सविस्तर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या होत्या. सदर प्रकरणी त्यांनी सादर केलेले खुलासे अमान्य करणेत येऊन त्यांचेवर पुढील शिस्तभंगाची कारवाई करणेची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रवाशी दंड वसुलीच्या नमूद केलेल्या रक्कमेमध्ये तफावत आढळून येत आहे, कारण उपक्रमातील सहाय्यक वाहतूक निरीक्षक आणि त्यांचे सहाय्यक मदतनीस अशा १६ कर्मचाऱ्यांनी माहे, मे २०१४ ते मार्च २०१५ या ११ महिन्यांच्या कालावधीत प्रवाशी दंड वसूली रुपये ३,९५,९९४/- इतकी केलेली आहे.

(५) कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रम हा शहरी प्रवाशी वाहतूक करणारी परिवहन सेवा असल्याने आगाऊ तिकिट वितरण केडीएमटी मध्ये होत नाही. परिवहन उपक्रमाच्या बसेस मार्गावर मार्गस्थ झाल्यावरच प्रवाशांना तिकिटे वितरीत करण्यात येतात. बस कही तांत्रिक कारणांमुळे ब्रेकडाऊन झाल्यास त्यांच्या प्रवासाची मागून येणाऱ्या अन्य केडीएमटीच्या बसेसमध्ये पर्यायी व्यवस्था केली जाते. त्यामुळे प्रवाशांनी अर्धवट प्रवास झाल्यानंतर तिकीटाचे पैसे परत मिळावे म्हणून अद्यापी तशी लेखी स्वरुपात कल्याण डोंबिवली महानगर पालिकेकडे मागणी अथवा तक्रार झालेली नाही.

---

**उल्हासनगर शहरालगत असलेल्या विठ्ठलवाडी**
**येथे बस डेपो सुरु करण्याबाबत**

**(८) ८६३७ (०७-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर शहरालगत असलेल्या विठ्ठलवाडी येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाचा बस डेपो हा सध्या बंद स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या ठिकाणाहून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बस डेपो सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) ठाणे विभागातील रा.प. विठ्ठलवाडी आगारात दैनंदिन ५२ नियते, १८९८६.२ कि.मी. व ५१३ फेऱ्या चालनात आहेत. या आगारात १४६ चालक व १४१ वाहक हजेरीपटावर असून त्यांचेद्वारे प्रवाशांच्या सोईकरीता दैनंदिन कामकाज सुरळीतपणे पार पाडले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द येथे वैनगंगा नदीवर उभारलेला इंदीरासागर राष्ट्रीय प्रकल्पात गेलेल्या सुरेवाडा या गावातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(९) ९७४२ (०४-०४-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द येथे वैनगंगा नदीवर उभारलेला इंदीरासागर राष्ट्रीय प्रकल्पात गेलेल्या सुरेवाडा या गावातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मोटारा येथे करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी व मंडळ निरीक्षकांच्या अहवालानुसार पुनर्वसन विभागाकडून सरेवाडा येथी किती नागरिकांना भुखंड आवंटीत करण्यात आले, तसेच, किती लोकांचे भुखंड रद्द करण्यात आले,

(३) असल्यास, यात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे खरे लाभार्थी भूखंडापासून मुकले असून या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या अहवालानुसार कोणत्याही नागरिकांना भुखंड आवंटित किंवा रद्द करण्यात आलेले नाही. जिहल्हाधिकारी भंडारा कार्यालयातील पुनर्वसन शाखेकडून जुलै/ऑगस्ट, २००१ मध्ये करण्यात आलेल्या कुटुंब सर्वेक्षणानुसार सन २००८ मध्ये ५७२ कुटुंबांना भुखाडाचे वाटप करण्यात आले. त्यापैकी एकच व्यक्तीची नावे दोन नमूद केली असल्यामुहे ७ भुखंड जिल्हाधिकारी, भंडारा कार्यालयाचे दिनांक २९/८/२००९ चे आदेशान्वये रद्द करण्यात आले.

(३) वाटपानंतर भूखाड मिळण्याबाबत करण्यात आलेलया २९८ अर्जदारांच्या अर्जानुसार चौकशी करण्यात आली असून त्यापैकी जवळपास २५० अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरित अर्जासंबंधी चौकशी करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अल्पसंख्यांक समाजाच्या विकासाकरिता अल्पसंख्यांक महामंडळातर्फे कर्मचाऱ्यांच्या मदतीने विकास योजना राबविण्यात येत असलेल्या संख्या वाढविणेबाबत**

**(१०) ११२३१ (०४-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या १६ टक्के असलेल्या अल्पसंख्यांक समाजाच्या विकासाकरिता अल्पसंख्यांक महामंडळातर्फे ३६ जिल्ह्यात केवळ ३५ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने विकास योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५०० कोटी रुपयांचे भाग भांडवल असणाऱ्या या महामंडळाला कर्मचारी संख्या अत्यल्प असल्यामुळे योजना कार्यान्वित करण्यासाठी व त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याकरिता कर्मचारी संख्या वाढविणेचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-१०-२०१५) :**(१) अंशत: खरेआहे.
(२) व (३) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे प्राधिकृत भागभांडवल रु.५००.०० कोटी इतके असून त्यापैकी सन २०१४-१५ पर्यंत शासनाने रु.३००.६९१० कोटी इतके भागभांडवल अदा केले आहे. महामंडळाचे कामकाज सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने महामंडळाचा सुधारित १५७ पदांच्या आकृतीबंधास शासनाने दि. १२ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली असून सदरची पदे प्रतिनियुक्ती/ नियमित नियुक्ती/इतर विभागात अतिरिक्त ठरलेले अधिकारी / कर्मचारी अथवा कंत्राटी पध्दतीने भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. महामंडळात कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांनी मा.उच्च न्यायालयात कायम स्वरुपी सामावून घेण्याबाबत रिट याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाने तद्नंतर कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांची पदे वगळून उर्वरीत पदभरती करण्यास मान्यता दिली आहे. महामंडळामार्फत त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एकरूख ते सोलापूर या रस्त्यावर धडक दिल्याने प्रवाशाचा झालेला मृत्यु**

**(११) ११३५० (०८-०३-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :**
सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी सोलापूर येथील एकरूख ते सोलापूर या रस्त्यांवर संजय बिटू सोनवणे या तरूणांचा एस.टी.बसने हगलूर येथे धडक दिल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर अपघाताची रा.प.महामंडळातर्फे चौकशी करण्यात आली आहे. अपघातास रा.प. चालक जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

राज्य परिवहन चालकास दि.०१.०२.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून दि. २७.०३.२०१५ च्या पत्रान्वये आरोपपत्र बजावण्यात आले असून सदर कार्यवाही सुरु आहे.

(३) सदर अपघातात मृत पावलेली व्यक्ती मोटार सायकल चालक (त्रयस्थ यांत्रिकी वाहन) असल्याने सदर प्रकरणी आर्थिक तात्कालीक मदत दि. ०८.०१.२०१५ अपघात नुकसान मागणीसाठीचे "पी" फॉर्म देण्यात आलेला आहे. मात्र, मृताचे वारसदार पत्नीने अपघात नुकसान भरपाईची मागणी न करता सोलापूर न्यायालयात रु. २०,००,०००/- ची अपघात नुकसान भरपाईसाठी दावा क्र. ३६/१५ दाखल केलेला असून अद्याप तो प्रलंबित आहे

---

**बदनापूर (जि.जालना) येथे नवीन बस स्थानक उभारणेबाबत**

**(१२) ११५३४ (०४-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर (जि.जालना) येथे नवीन बस स्थानक उभारणेबाबतचा प्रस्ताव १ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तांवावर अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार बदनापूर येथे नवीन बस स्थानक उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

बदनापूर (जि.जालना) येथे १२.२०१३ मिटर आकारचा प्रवासी निवारा बसांधलेला होता. रस्ता रुंदीकरणाकरीता सदर बांधकाम पाडण्यात आले. सद्यस्थितीमध्ये बदनापूर येथून १४६ रा.प. फे-या चालनामध्ये आहेत. बदनापूर येथे रा.प. महामंडळाच्या मालकीची जागा नाही. ग्रामपंचायतीने अपर दुधना प्रकल्पाची जलसंपदा विभागाची जागा प्रस्तावित केली आहे. सदरची जागा प्राप्त करुन घेण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातून सातारा जिल्हयातील रहिवाश्यांना जाण्याकरिता बोरिवली-सातारा रात्री १०.३० वाजताची एसटी सेवा पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(१३) ११६७३ (०४-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातून सातारा जिल्हयातील रहिवाश्यांना जाण्याकरिता बोरिवली-सातारा रात्री १०.३० वाजताची एसटी सेवा पुन्हा सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जानेवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास आगार प्रमुख, ठाणे यांना एक लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बस सेवा सुरु करण्यासंदर्भात राज्य परिवहन महामंडळाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) बोरीवली-सातारा ही फेरी रा.प. ठाणे विभागास बारमाही स्वरुपात मंजूर असून कमी भारमानामुळे ही फेरी फक्त गर्दीच्या हंगामात चालविण्यात येत आहे. यावर्षी उन्हाळी जादा हंगामासाठी दिनांक २१.४.२०१५ पासून ठाणे विभागाच्या ठाणे आगार क्र.१ येथून सदर फेरी सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एसटीच्या वार्षिक सवलत कार्डमध्ये बदल करुन ते कौटुंबिक कार्ड बनविण्याबाबत**

**(१४) ११८४८ (०४-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एसटीच्या वार्षिक सवलत कार्डमध्ये बदल करुन ते कौटुंबिक कार्ड बनविण्याबाबत महामंडळाच्या बैठकीत माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठराव संमत होऊनही तो निर्णय एसटीतील संबंधित खात्याकडे पोहचला नाही, हे खरे आहे काय,
(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून सुरु होणार,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्य परिवहन महामंडळाने ऑगस्ट, २०१४ मध्ये वार्षिक सवलत कार्ड योजनेत काही बदल करण्याचा तसेच कुटूंबासाठी स्वतंत्र वार्षिक सवलत कार्ड योजना सुरु करण्याचाही निर्णय घेतला आहे.

सदर ठरावानुसार ई.टी.आय.एम. (इलेक्ट्रॉनिक तिकीट ईश्युईंग मशिन) या मध्ये तांत्रिक बदल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर परिपत्रकीय सुचना निर्गमित करुन तसेच सदर कौटुंबीक कार्डची छपाई करुन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत वाहन उभे करण्यासाठी जागा उपलब्ध करण्याबाबत**

**(१५) १२१३४ (१०-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वाहन उभे करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी वाहन मालकांकडून जोपर्यंत कागदपत्रे दाखविण्यात येत नाही तोपर्यंत त्यांच्या वाहनाची नोंदणी केली जाणार नाही अशा अटींचा समावेश असलेली योजना आखण्याची सूचना मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी शासनाला आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने योजना आखली आहे काय,

(३) असल्यास, ही योजना केव्हापासून अंमलात येणार आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) :**(१) मुंबईमध्ये वाढत्या वाहनसंख्यामुळे होणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी जनहीत मंच, मुंबई यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. ६२/२०१४ वर दि.११.०२.२०१५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालयाने पार्किंगच्या समस्येबाबत मल्टीलेवल / अंडरग्राऊंड पार्किंग उपलब्ध करणे, वाहनांची खरेदी / नोंदणी करण्यासठी पार्किंगच्या जागेचा पुरावा मागणी, चूकीच्या ठिकाणी / सार्वजनिक ठिकाणी वाहने उभी करण्याबद्दलच्या दंडात वाढ करणे या बाबींवर उपाययोजना करण्याची सूचना शासनास दिली आहे.

(२) व (३) सदरच्या उपाययोजना शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

**कृषि विद्यापीठामार्फत मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्यापैकी काही जमिनी वापराविना पडून असल्याबाबत**

**(१६) १२१४४ (०८-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण कृषि विद्यापीठामार्फत मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत व सदर जमिनी बक्षीसपात्र न करता सदर जमिनीवर शाळा बांधकामे व विहिरी खोदून बांधकामे केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच कृषि विद्यापीठाने जमिनी संपादित केल्या आहेत त्यापैकी काही जमिनी वापराविना पडून आहेत, त्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळाव्यात अशी मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) :**(१) कोकण कृषि विद्यापीठाकडे एकूण १९५८.०३ हेक्टर जमीन असून कृषि विद्यापीठाच्या ताब्यात असलेल्या जमीनीवर अनधिकृत बांधकामे झालेली नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील परिवहन विभागात वाढलेल्या गैरव्यवहाराला आळा घालण्याबाबत**

**(१७) १२३९० (०४-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिवहन विभागात वाढलेल्या गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी राज्याच्या परिवहन आयुक्तांनी आरटीओ कार्यालयांमध्ये चालणाऱ्या एजंटांच्या कामाला आळा घालण्याचा माहे जानेवारी २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारस निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) अद्यापही या प्रकरणाची अंमलबजावणी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) :**(१) होय.

(२) परिवहन कार्यालयात नागरीकांस दलालाकडे जावे लागू नये म्हणून मार्गदर्शन कक्ष, एक खिडकी योजना, ऑनलाईट अपॉईंन्टमेंट, वेबसाईटद्वारे फार्म व कार्यपध्दतीची माहिती आणि कार्यालयात लावलेले माहिती फलक यासारख्या विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

तसेच, अर्जदाराने प्राधिकृत केलेली व अधिकारपत्र धारण करणारी व्यक्ती कार्यालयात असल्यास, या व्यक्तीबाबत खातरजमा करुन संबंधित अर्जदाराचा अर्ज अधिकारपत्रधारक व्यक्तीमार्फत स्विकारला जाण्याबाबत मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी याचिका क्र. ४४३/२०१५, ६०१/२०१५ व ८९२/२०१५ मध्ये दि. २५.०३.२०१५ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यावाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात रुक्मीणीचे माहेरघर असलेल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर परिसरात काही व्यवसायिकांनी बार उघडण्यासाठी प्रयत्न सुरु केल्याबाबत**

**(१८) १२५३२ (०७-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात रुक्मीणीचे माहेरघर असलेल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर परिसरात काही व्यवसायिकांनी बार उघडण्यासाठी खटाटोप सुरु केल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला असून त्यामुळे प्रशासनाने कोणत्याही रेस्टॉरन्ट आणि बिअरबारला परवानगी देवू नये असा ठराव ग्रामपंचायतीसह सहा.संस्थानही पारित केला असून जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर केले असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी रेस्टॉरन्ट आणि बिअरबारला परवानगी न देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१५) :**(१) होय.

(२) एफएल-३ अनुज्ञप्ती बाबत निकषांची पूर्तता होत असल्याने या ठिकाणी दि.११.८.२०१४ अन्वसे अनुज्ञप्ती मंजूर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विभागामध्ये गारपीटीमुळे या भागातील शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाल्याबाबत**

**(१९) १२७१७ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागामध्ये प्रामुख्याने संत्रा या पिकाची शेती शेतकरी करीत असतात, अलिकडेच झालेल्या गारपीटीमुळे या भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाले असून त्यांना नुकसान भरपाईसाठी पिक विमा योजना कंपनीकडे मागणी केली असता शासन निर्णयाचा "सलग सात दिवस एकून ३० मी.मी. किंवा त्यापेक्षा जास्त" या शब्दामुळे त्यांना पिक कंपनी नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करीत असल्याची बाब दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर "सलग" शब्द दुरूस्ती करण्यासाठी व अवकाळी पावसाने झालेले नुकसान भरपाई देण्यासंबधी शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही. मात्र यासंदर्भात मार्गदर्शन करण्याबाबतचा दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजीचा विनंती अर्ज जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांच्याकडे दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी प्राप्त झाला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत्रा या फळपिकाचे स्वतंत्र धोरण शासनाने आखण्याबाबत**

**(२०) १२९४७ (०८-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत्रा या फळपिकाचे स्वतंत्र धोरण शासनाने आखण्याबाबत संत्रा उत्पादकांच्या फलोत्पादन मंत्री व कृषि सहसंचालकांशी ब-याच बैठका झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत्रा पिकाबाबत कोणतेही स्वतंत्र धोरण अद्यापी शासनाने मंजूर केलेले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब क्रं.१ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संत्रा धोरण तातडीने मंजूर करुन अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

सन २०११ मध्ये नागपूर व अमरावती येथे एक व सन २०१२ मध्ये शासनस्तरावर एक अशा तीन बैठका संत्रा उत्पादकांच्या समस्यांबाबत चर्चा करण्याकरिता घेण्यात आल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कांद्री (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील देशी दारू दुकानाचे परवाना रद्द करण्याबाबत**

**(२१) १४९३० (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांद्री (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील देशी दारू दुकानाचे परवाना रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (तुमसर) यांनी जिल्हाधिकारी भंडारा यांना दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यवाहीचे अधिकार आयुक्त, राज्य उत्पादक शुल्क महाराष्ट्र राज्य यांना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०५-२०१५) :**(१) होय. श्री.चरण वाघमारे, विधान सभा सदस्य यांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांना दि. १६.१.२०१५ रोजी पत्र दिले आहे.

(२) व (३) सदर कार्यवाहीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असून जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत राज्याला मिळणारा निधी केंद्र शासनाने कपात केल्यामुळे राज्यातील फलोत्पादन अभियान अडचणीत आल्याबाबत**

**(२२) १६२८२ (११-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने चालू वर्षी देशात राबविण्यात येणा-या राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या निधीत गेल्या वर्षीच्या तुलनेत ३०३ कोटी रुपयांनी कपात केली असून वार्षिक कृती आराखड्यामध्येही कपात करण्याचे निदेश दिल्यामुळे महाराष्ट्राचा वार्षिक कृती आराखडा २६ कोटी रुपायांनी कमी झाला तसेच गेल्या पाच वर्षातील सर्वात कमी १४४ कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाही संसद ग्राम आदर्श योजनेअंतर्गत, प्रत्येक लोकसभा व राज्यसभा मतदारसंघ क्षेत्रात कृषि प्रदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्यासाठी राज्यांनी प्रत्येक खासदाराला २ लाख रुपये निधी राखून ठेवण्यात यावा अशा सूचन केंद्रीय कृषी मंत्रालयाने फलोत्पादन अभियानाच्या सर्व राज्य संचालकांना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे फलोत्पादन अभियानावर निधी उपलब्धतेवर परिणाम होणार असून, अगोदरच निधी कपात पुन्हा उपलब्ध निधी इतर कामासाठी द्यावा लागणार असल्याने, फलोत्पादन अभियान संकटात सापडले आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, फलोत्पादन अभियानास पुरेसानिधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अल्पसंख्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढविण्याबाबत.**

**(२३) १६२८४ (११-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याकांचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढविण्यासाठी राज्यातील सर्व उर्दु शाळात मराठी फाऊंडेशन वर्ग सुरु करण्यात येणार असून मराठी शाळांतही अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाचे विद्यार्थी वाढावेत यासाठी राज्यातील सर्व मराठी शाळांतही ऊर्दुचे वर्ग सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मा.अल्पसंख्याक मंत्री यांनी दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमरास प्रसारमाध्यमांना दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सदर निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता किती ऊर्दु व मराठी शिक्षकांची भरती करावी लागणार आहे,

(४) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-११-२०१५) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) अल्पसंख्याकांचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढविण्यासाठी राज्यातील सर्व उर्दू शाळांसह अमरावती शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ८ वी, ९ वी, १० वी इयत्तेच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मराठी भाषा फौंडेशन वर्ग योजना शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र.मभायो-२०१३/प्र.क्र..६७/का.९, दि.२७/०४/२०१५ अन्वये सुधारित स्वरुपपा सुरु केली आहे. त्यामध्ये शिक्षकांच्या नियुक्त्या मानसेवी तत्वावर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येतात. मराठी शाळांतही अल्पसंख्यांक समाजाचे विद्यार्थी वाढावेत यासाठी इतर ऐच्छिक भाषांच्या पर्यायामध्ये उर्दू भाषेचा पर्याय उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील शेतकऱ्याच्या साखळी विकास करण्याच्या योजनेबाबत**

**(२४) १६२९६ (१२-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना साखळी विकास करण्याच्या योजनेअंतर्गत सार्वजनिक खाजगी भागीदारीतून एकात्मिक कृषीविकास या उपक्रमांतर्गत वर्ल्ड इकोनॉमिक फोरम यांच्या सहकार्याने खाजगी कंपन्या आणि शेतकऱ्यांच्या सहभागातून मूल्यसाखळी विकास कार्यक्रम शासनाने सुरू केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक २४ एप्रिल, २०१५ च्या सुमारास एक विशेष बैठक मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे व सदर योजनेची संपूर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, किती कालावधीत तसेच त्यासाठी लागणाऱ्या निधीची उपलब्धता करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) :**(१) होय,

(२) होय,

(३) व (४) शासनाच्या प्रचलित योजनेतून तसेच शेतकऱ्यांच्या व खाजगी गुंतवणूकदारांच्या व सहभागाने उत्पादनापासून विक्रीपर्यंत व्यवस्था असणाऱ्या मूल्य-साखळी निर्मितीच्या प्रकल्पाची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात करण्यात येत आहे, सदर प्रकल्पांकरिता राष्ट्रीय कृषि विकास

योजनेतंर्गत तसेच विविध प्रचलित योजनेअंतर्गत आवश्यक निधीचे नियतवाटप मंजूर करण्यात आले आहे,
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**हिंगोली जिल्हयातील औद्योगिक वसाहतीतील एका खासगी गोदामातून महाबीजचे १७५ क्विंटल सोयाबीन चोरट्यांनी पळविल्याबाबत**

**(२५) १६९५५ (०६-०८-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील औद्योगिक वसाहतीतील एका खासगी गोदामातून महाबीजचे १७५ क्विंटल सोयाबीन चोरट्यांनी पळविले असूनही संबंधित महाबीजने अद्यापही संबंधित पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली नसल्याचे माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषी व्यक्तींविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-११-२०१५) :**(१) हिंगोली जिल्हयातील औद्योगिक वसाहतीतील एका खाजगी गोदामातून महाबीजचे १६२ क्विंटल हरभरा बियाणे दिनांक ९/०५/२०१५ रोजी चोरीला गेले हे खरे आहे. याबाबत ग्रामीण पोलीस स्टेशन हिंगोली येथे गु.र.नं. ५१/२०१५ अन्वये गुन्हा करण्यात आलेला आहे,
(२) होय,
(३) उक्त गुन्हयात ३ दोषी व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे, अधिक तपास चालू आहे,
(४) विलंब झालेला नाही.

---

**सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष उत्पादक शेतक-यांना संकटांचा सामना करावा लागत असल्याबाबत**

**(२६) १८२२२ (०६-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) द्राक्ष उत्पादक शेतक-यांना सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे संकटांचा सामना करावा लागत असल्याने द्राक्षबागांसाठी प्लॅस्टिक आच्छादनांचा वापर करुन नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना खर्चावर ५० टक्के अनुदान देण्याची नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी व

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाने शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) सदर बाब शासन स्तरावरुन तपासण्यात येत आहे.

---

## येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

**(२७)  १८२७८ (१२-०८-२०१५).   श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) :**(१) होय.
(२) येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषि महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबतच्या विनंतीच्या अनुषंगाने तपासणी करण्याचे निर्देश महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना देण्यात आला आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र सरकारच्या धर्तीवर कृषी मुल्य आयोग गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याबाबत

**(२८)  १८६१२ (२५-०८-२०१५).   श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावेत व ग्राहकांना वाजवी दरात शेती माल खरेदी करता यावा यासाठी शेतीमाल भाव समितीचे पुर्नगठण करुन केंद्र सरकारच्या धर्तीवर कृषी मुल्य आयोग गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०९-२०१५)** :(१), (२) व (३) कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृमुआस्था-२०१४/प्र.क्र.५९/शेमाभास-११अे, दि. २३ एप्रिल, २०१५ अन्वये "राज्य शेतमाल भाव समितीचे" रुपांतर 'राज्य कृषि मूल्य आयोगात' करण्यात आलेले आहे. सदरचा आयोग प्रशासकीय स्वरुपाचा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लांजा (जि.रत्नागिरी) येथे सर्वात मोठे आणि नव्याने मध्यवर्ती अद्यावत एस.टी. स्थानक उभारण्याबाबत**

**(२९) १८९५२ (०६-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) येथे सर्वात मोठे आणि नव्याने मध्यवर्ती अद्यावत एस.टी. स्थानक उभारण्याचा निर्णय घेऊन अद्याप सदर बसस्थानकाच्या कामाला सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देऊन लवकरात लवकर बस स्थानक उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५)** :(१), (२) व (३) लांजा बसस्थानकाची पुनर्बांधणी करण्याच्या कामास राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाकरिता सन २०१५-१६ च्या सर्वसाधारण योजनेमधून निधी उपलब्ध करुन घेण्याची बाब तसेच कामाच्या "ई" निविदा मागविण्याबाबतची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेती व शेतक-यांच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणा-या विविध योजनाबाबत**

**(३०) १९२१६ (१२-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेती व शेतक-यांच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणा-या विविध योजना शेतक-यांपर्यंत पोहचविण्यासाठी कृषी विभागाने ११२ कोटी ९२ लाख रुपयांचा धडक

कृषी विस्तार कार्यक्रम शासनाने माहे सप्टेंबर, २०१३ च्या सुमारास हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यासाठी कोणते निकष ठरविण्यात आले आहेत तसेच त्याची कालमर्यादा काय राहणार आहे,

(३) असल्यास, सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनसाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही, तथापि, शासन निर्णय व पदुम विभागी दि. ५ सप्टेंबर, २०१३ अन्वये राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्ताराविषयक सुधारणाकरिता सहाय्य (Support to State Extension Reforms) केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सन २०१३-१४ करिता मंजूर केलेल्या रु.११२००.९२ लक्ष चा कार्यक्रम राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती,

(२) सन २०१३-१४ मध्यक सदर योजनेतंर्गत केंद्र व राज्य शासनाकडू अनुक्रमे रु.६१४४.३२ लक्ष व रु.१२३६.४६ लक्ष असा एकूण रु.७३८०.७८ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला त्यापैकी रु.६७४२.८४ लक्ष एवढा खर्च करण्यात आला व उर्वरीत निधी रु.६३७.०४ लक्ष हा निधी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनाननुसार सन २०१४-२०१५ च्या कार्यक्रमासाठी वर्ग करण्यात आला,

(३) सदर योजनंतर्गत शेतकरी प्रशिक्षण प्रात्यक्षिके, शेतकरी अभ्यास दौरे, शेती शाळा, शेतकऱ्यांचे गट संघटन इत्यादी मुख्य घटकांचा समावेश होत, सदर कार्यक्रम सन २०१३-१४ या आर्थिक वर्षा करिताच मंजूर करण्यात आला होता,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्माची मान्यता देण्याबाबत**

**(३१) १९६८० (३०-०७-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिंगायत हा स्वतंत्र धर्म असून या धर्माची स्थापना १२ व्या शतकांत झालेली असतांनाही स्वातंत्र्यानंतर या समाजबांधवांची नोंद हिंदू अशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजाचे बांधव राज्यात मोठया संख्येने राहत असून लिंगायत धर्मियांसाठी एल व ७ नंबर सांकेतांक मिळावा अशी त्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लिंगायत समाज बांधवांना अल्पसंख्यांक दर्जा मिळावा आणि केंद्र शासनाकडून लिंगायत धर्मास स्वतंत्र धर्माची मान्यता देण्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला आहे वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-१२-२०१५)** :(१) नाही.

लिंगायत समाज हा स्वतंत्र धर्म नसून हिंदू धर्माचा एक पंथ असल्याने सहायक रजिस्ट्रार जनरल, सामाजिक अध्ययन प्रभाग, गृह मंत्रालय, केंद्र शासन व राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग यांनी त्यांच्या दि.१४/११/२०१३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) या विभागाने दि.२१/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये लिंगायत समाजाला अल्पसंख्यांक दर्जा देण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाच्या अहवालाची माहिती अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून मागितली होती.त्यांनी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे दि.१३/५/२०१४ रोजीचे अभिप्राय राज्य शासनास पाठविले आहेत व त्यामध्ये लिंगायत हा स्वतंत्र धर्म नसून हिदू धर्माचा एक पंथ असल्याचे नमूद केले आहे. तसेच या समाजासाठी स्वतंत्र सांकेतांक देण्याची मागणी सहायक रजिस्ट्रार जनरल, सामाजिक अध्ययन देण्याची मागणी सहायक राजिस्ट्रार जनरल, सामाजिक अध्ययन प्रभाग, गृह मंत्रालय, केंद्र शासन यांनी त्यांच्या दि.१४/११/२०१३ च्या पत्रान्वये अमान्य केली आहे. त्यामुळे लिंगायत समाजाला स्वतंत्र धर्माचा व अल्पसंख्यांक दर्जा देणे अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाकडून शेतक-यांना सन २०११-१२ खरीप अनुदान, सन २०१२-१३ खरीप अनुदान व सन २०१४ (मार्च-एप्रिल) गारपीट नुकसान वाटप अनुदान व यावर्षीचे सन २०१४-१५ दुष्काळग्रस्त अनुदान अशा चार वेळा नुकसानीबाबत मदत स्वरुपात रोख अनुदान वाटप केल्याबाबत**

**(३२) १९७७३ (११-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून शेतक-यांना देण्यात आलेल्या सन २०११-१२ खरीप अनुदान सन २०१२-१३ खरीप अनुदान व सन २०१४ (मार्च-एप्रिल) गारपीट नुकसान वाटप अनुदान व यावर्षीचे सन २०१४-१५ दुष्काळग्रस्त अनुदान अशा चार वेळा शेतक-यांना नुकसानीबाबत मदत स्वरुपात रोख अनुदान वाटप करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुदानात मोताळा तालुक्यातील (जि.बुलढाणा) तलाठ्याने सुमारे १ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित तलाठ्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-११-२०१५)** :(१) हे खरे नाही. सदर मदत रोख स्वरुपात न देता, बुलढाणा जिल्ह्यात मदतीची रक्कम शेतकऱ्यांचे प्रत्येक बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.

(२) मोताळा तालुक्यातील तलाडयात रु. ५२.०० लक्ष इतक्या रकमेची अनियमितता केल्याचे आढळून आले आहे.
(३) होय,
(४) दोषी तलाठी श्री.एन.टी.उज्जैनकर यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच, त्यांची खाते चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांना शेतीच्या कामासाठी अल्प भाडे आकारुन यांत्रिक अवजारे पुरविण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत 'अवजारे बँक' स्थापन करण्याबाबत**

**(३३) २०००५ (१०-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना शेतीच्या कामासाठी अल्प भाडे आकारुन यांत्रिक अवजारे पुरविण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत 'अवजारे बँक' स्थापन करण्याची घोषणा मा.महसूल मंत्री, यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घोषणेनुसार राज्यात कोणकोणत्या जिल्हयात वा तालुक्यात अशा अवजारे बँका स्थापन करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदरच्या अवजारे बँका केव्हापासून कार्यान्वित होणार आहे,
(४) अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-१०-२०१५) :**(१), (२) व (३) सन २०१४-१५ पासून केंद्र पुरस्कृत कृषी अभियांत्रिकरण उपअभियांतर्गत भाडेतत्वावर कृषी यांत्रिकीकरण सेवा सुविधा पुरविण्यासाठी अवजारे बँक स्थापन करुन त्याद्वारे शेतकऱ्यांना सेवा-सुविधा पुरविण्यात येत आहेत, सदर बँका मुंबई उपनगर वगळता राज्यातील उर्वरित ३४ जिल्हयांमध्ये स्थापन करण्यात येत आहेत,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील हिंगोली-परभणी मार्गावरील औंढा नागनाथ ते झिरो फाटा दरम्यानच्या गावांतील प्रवासी निवा-यात अस्वच्छता असल्याबाबत**

**(३४) २०८४० (०६-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील हिंगोली-परभणी मार्गावरील औंढा नागनाथ ते झिरो फाटा दरम्यानच्या गावांतील प्रवासी निवा-यात अस्वच्छता आहे हे खरेआहे काय.
(२) असल्यास, या मार्गावरील वागरवाडी, आसोला, बारशिव, कारखाना, जवळाबाजार कळंबा व

हटटा ई. गावच्या बसस्थानकांवर प्रवाशांकरिता निवा-याची सोय नाही तसेच हॉटेल, पान टपरी, किवा झाडांचा आसरा प्रवाशांना घ्यावा लागतो खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांकरीता विविध उपक्रम राबविण्यात राज्य परिवहन महामंडळाकडून या दरम्यान प्रवासी वर्गासाठी प्रवासी निवा-याची सोय लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :**(१), (२) व (३) औढा नागनाथ ते झिरो फाटा दरम्यान नागेशवाडी, बारशिव, आडगाव व झिराफाट हे प्रवाशी निवारे असून त्यापैकी बारशिव, आडगांव व झिराफोटा येथील प्रवाशी निवाऱ्यांच्या ठिकाणी महामंडळामार्फत काळजीवहाकाची (केअर टेकरची) नेमणूक केली असून तेथील स्वच्छता त्यांचेमार्फत करण्यात येते.

प्रवाशी निवाऱ्याची देखभाल व दुरुस्ती तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करावयाची असल्याने नागेशवाडी येथील प्रवाशी निवाऱ्याची स्वच्छता स्थानिक स्वराज्य संस्थेकडून करणे अपेक्षित आहे.

महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने महामंडळास प्रवासी निवारा बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याने वागरवाडी, असोला, बारशिव कारखाना, जवळाबाजार कळंबा व हट्टा या ठिकाणी प्रवाशी निवारे बांधण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खोपोली (जि.रायगड) येथील एस.टी. स्थानकाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याबाबत

**(३५) २०९५६ (०६-०८-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली (जि.रायगड) येथील एस.टी. स्थानकाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून प्रवाशांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एस.टी. स्थानकाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर एस.टी. स्थानकाची दुरवस्था सुधारुन प्रवाशांना सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :**(१), (२) व (३) खोपोली बसस्थानक हे सन १९५५-५६ साली बांधण्यात आले आहे. सदर बसस्थानकावर प्रवासी शेड, कंट्रोल केबीन, रात्र वस्तीसाठी चालक/वाहक यांच्यासाठी रेस्ट रुम असून स्थानकावर प्रवाशांसाठी कॅन्टीन, पेपर स्टॉल, तसेच सुलभ शौचालयाचे स्वच्छतागृह इ. सेवा उपलब्ध आहेत.

सदर बसस्थानकाचे नुतनीकरण करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीकडून स्थानिक

विकास कामांतर्गत निधी उपलब्ध करुन घेण्यावी बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) हे तालूक्याचे ठिकाण असतानाही रेणापूर बस स्थानकात एस.टी. महामंडळाच्या बसेस येत नसल्याबाबत**

**(३६) २१०२८ (०६-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर (जि.लातूर) येथील बस स्थानकात एस.टी. महामंडळाच्या बसेस येत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याची माहिती दिनांक २१ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन राज्य परिवहन विभागाच्या रेणापूर मार्गावरील सर्व बसेस बसस्थानकात येण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुसावळ बस स्थानकात बसेस लावण्याच्या जागेवर भाजी विक्रेत्यांनी ठाण मांडल्याने प्रवाशांना नाहक त्रास होत असल्याबाबत**

**(३७) २१६९० (११-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ बस स्थानकात बसेस लावण्याच्या जागेवर भाजी विक्रेत्यांनी जागेवर अतिक्रमण केल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकात प्रवाशांना सोडण्यास येणारी खाजगी वाहने आगारात कुठेही उभी केली जातात हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आगारातील समस्या सोडवून सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) भुसावळ बसस्थानकातून दिवसभरात राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या ५१६ येणाऱ्या व जाणाऱ्या फेऱ्या चालनात आहेत. तसेच बसस्थानकावर सकाळी ०४.०० ते रात्री २३.०० वा. पर्यंत तीन पाळ्यांमध्ये वाहतूक नियंत्रक कामगिरीवर असून रात्रीच्या कालावधीत

सुरक्षा रक्षक कामगिरीवर असतात.
भुसावळ बसस्थानकाम बसेस लावण्याच्या जागेवर भाजी विक्रेत्यांनी तसेच अन्य कोणीही अतिक्रमण केलेले नसल्याबाबत, तसेच, बसस्थानकात प्रवाशांना सोडण्यास येणारी खाजगी वाहने आगारात येत नसल्याबाबतची खातरजमा राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर करुन घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा बस आगारात मुक्कामी असलेल्या चालक वाहकांसाठी बांधलेल्या विश्रामगृहात अनेक सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(३८) २२९६२ (११-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या बुलढाणा बस आगारात मुक्कामी असलेल्या चालक वाहकांसाठी नव्याने प्रशस्त बांधलेल्या विश्रामगृहात अनेक सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बस आगारात खिडक्यांची तुटलेली तावदाणे, शौचालयात साचलेली घाण स्वच्छतेचा अभाव, त्यामुळे सर्वत्र सुटलेली दुर्गंधी अशा अनेक बिकट परिस्थितीत चालक व वाहकांना रात्रीचा मुक्काम करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, बुलढाणा बस आगारातील चालक वाहकांसाठी नव्याने प्रशस्त बांधलेले विश्रामगृह सोयी-सुविधाने युक्त करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.
बुलढाणा आगारात १२.५ मी. X ५.७५ मी = ७१.८७ चौ.मी. आकाराचे विश्रांतीगृह बांधलेले आहे. सदरील विश्रांतीगृहात दोन संडास, एक बाथरुम, दोन मुतारी यांची व्यवस्था आहे. विश्रांतीगृह ०६ पंखे, ०४ ट्युब, उक आरसा, एक मोठी सतरंजी, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत. विश्रांतीगृहाच्या काही खिडक्यांच्या काचा फुटक्या असून विश्रांतीगृहाच्या दुरुस्तीच्या कामासाठी रु. २,२९,०००/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असुन निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. विश्रांतीगृहाची नियमितपणे स्वच्छता राखण्याबाबत योग्य ती दक्षता राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गेल्या ५ वर्षापासून खासगी आराम बसच्या धर्तीवर धावणारी कोल्हापूर-पुणे-शिवनेरी व्होल्वो बसची सेवा बंद करण्यात आल्याबाबत**

**(३९) २३२१६ (१९-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-पुणे-शिवनेरी व्होल्वो बसची सेवा दिनांक २५ एप्रिल पासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बसला पुरेसे प्रवासी मिळत असताना सुद्धा ही बस सेवा बंद करुन या बस मुंबईकडे वळविण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बस सेवा बंद करण्याची सर्वसाधारण कारणे कोणती व बस सेवा पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०६-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.

गतवर्षीच्या गर्दीच्या हंगामातील भारमनाचा आढावा घेऊन कोल्हापूर-पुणे मार्गावरील वातानुकूलित शिवनेरी फेऱ्या तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करुन पुणे दादर मुंबई ठाणे मार्गावर चालविण्यात येत आहेत.

(३) कोल्हापूर ते पूणे मार्गावरील चालनात असलेल्या वातानुकूलित शिवनेरी फेऱ्यांचे भारमानापेक्षा कमी असल्याने तसेच पुणे विभागाकडील असलेल्या भाडेतत्वावरील वातानुकूलित बसेसच्या कराराची मुदत पूर्ण होत असल्याने मार्गावरील बसेसची कमतरता धरुन काढण्यासाठी कोल्हापूर ते पुणे मार्गावरील सदर फेऱ्या तात्पुरत्या स्थगित करुन, पुणे विभागास कोल्हापूर विभागाकडील ४ वातानुकूलित बसेस वर्ग करण्यात आलेल्या आहेत. महामंडळ स्तरावर शिवनेरी बसेसची उपलब्धता झाल्यानंतर गर्दीच्या फेऱ्या पुर्ववत सुरु करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव, बाभुळगाव, कळंब या तालुक्याच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व सुलभ स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्याबाबत**

**(४०) २३४७४ (११-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव, बाभुळगाव, कळंब या तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या बसस्थानकावर प्रवाशाकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व सुलभ स्वच्छतागृह नसल्यामुळे अनेक प्रवाशांना त्रास होतो दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बसस्थानकावर तसेच प्रत्येक तालुक्यातील बसस्थानकात पिण्याच्या पाण्याची व सुलभ स्वच्छतागृहाची कायम व्यवस्था करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव, बाभुळगांव येथील बसस्थानकावर प्रवाशांकरीता पिण्याच्या पाण्याची, महिला/पुरूषांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्थाआहे. तसेच कळंब बसस्थानक येथे दि.१६.०५.२०१५ पासून महिला/पुरुषांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह कार्यान्वित केले असून यवतमाळ जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणच्या बसस्थानकावर पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची व्यवस्था आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील स्वारगेट एसटी स्टँडवर रेल्वे स्टेशनच्या**
**धर्तीवर प्लॅटफॉर्म तिकीट सुरु करण्याबाबत**

**(४१) २३६७२ (०६-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील स्वारगेट एसटी स्टँडवर रेल्वे स्टेशनच्या धर्तीवर प्लॅटफॉर्म तिकीट सुरु करण्याचा माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास वाहतूक शाखेकडे सादर करण्यात आलेला प्रस्ताव गहाळ झाल्याचे माहे मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अंती सदरहू प्रस्ताव गहाळ करणा-या व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर सीबीएस बसस्थानक परिसरातून सुरू असणारी अवैध वाहतूक, बेशिस्त**
**पार्किग आणि फिरत्या खाद्यपदार्थ विक्रीमुळे बसस्थानक परिसरातील**
**वाहतुकीचा खोळंबा होत असल्याबाबत**

**(४२) २३९२३ (११-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराचे मध्यवर्ती ठिकाण असणाऱ्या सीबीएस बसस्थानक परिसरातून सुरू असणारी अवैध वाहतूक, पार्किंग आणि फिरत्या खाद्यपदार्थ विक्रीमुळे बसस्थानक परिसरातील वाहतूकीचा खोळंबा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरू असलेली अवैध वाहतूक रोखण्यासाठी व उक्त प्रकारास आळा घालण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) जिल्हा पोलीस अधिक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक नियंत्रण शाखा यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिहन महामंडळामार्फत वेळोवेळी पत्राव्दारे व प्रत्यक्ष भेटून बसस्थानक परिसरातील सुरु असणारी अवैध वाहतूक बंद करणे व पार्किंग हटविण्यासंदर्भात मागणी करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात सन २०१४ मध्ये एसटीचे १२९ अपघात झाले असून यात १३ प्रवाशांचा मृत्यु झाल्याबाबत**

**(४३) २४२८० (११-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात सन २०१४ मध्ये एसटीचे १२९ अपघात झाले असून यात १३ प्रवाशांचा मृत्यु झाल्याप्रकरणी तसेच आगारातील विविध समस्यांबाबत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १५/४/२०१५ रोजीच्या सुमारास एसटीचे जळगांव विभागीय नियंत्रक यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :** (१) व (२) सन २०१४ मध्ये एस.टी.चे किरकोळ २२, गंभीर ९६ व प्राणांतिक १९ असे एकूण १३७ अपघात झाले आहेत. सदर अपघातात २ रा.प.प्रवासी, ५ पादचारी व अन्य वाहनांतील १६ असे एकूण २३ जण मयत झाले आहेत. २३ मयतांचा नातेवाईकांना नुकसान भरपाई राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर अदा करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

जळगांव बसस्थानकाम प्रवाशांना बसण्यासाठी खुर्चाची दुरुस्ती करण्यात आली आहे. बसस्थानकामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृह असून त्याची दुरुस्ती व स्वच्छता नेमलेल्या संस्था चालकांकडून करुन घेण्यात आली आहे. दुचाकी वाहनतळ परवाना धारकास मंजूर जागे व्यतिरिक्त जागा वापरण्यात प्रतिबंध करण्यात आला आहे. स्नॅकबार परवानाधारकास अतिरिक्त जागा परिपत्रकानुसार मंजूर असून त्यांचेकडून अतिरिक्त जागेचे शुल्क आकारण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करुन त्या आधारे वफ्फ बोर्ड अधिनियम १९९५ अंतर्गत कार्यवाही करण्याचा निर्णयाबाबत

**(४४) २४७६९ (०८-०९-२०१५). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी टास्क फोर्स स्थापन करुन त्या आधारे वक्फ बोर्ड अधिनियम १९९५ अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय शासनामार्फत माहे मे, २०१५ वा त्या सुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिक्रमण झालेल्या जमिनी मुक्त करुन त्या जमिनी वफ्फ बोर्डाकडे पुन्हा सोपविण्यात अथवा बाजार भावाने कर आकरणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आह काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२७-१०-२०१५) :**(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या न्या.ए.टी.ए.के. शेख, चौकशी आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये बेकायदेशीर व्यवहार झाल्याचे नमूद केले आहे, अशा सर्व प्रकरणांमधील संबंधित वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्यादृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे कार्यावाही करताना अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवण्याची शक्यता आहे. वक्फ मंडळाकडे सध्या उपलब्ध असलेला कर्मचारीवृंद हा अपुरा व अप्रशिक्षित आहे. याबाबी विचारात घेता, सदरची कार्यवाही करण्यासाठी वक्फ मंडळाला सहाय्य करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली तीन वर्षासाठी एक उपजिल्हाधिकारी, दोन तहसीलदार आणि दोन नायब-तहसीलदार यांचा समावेश असलेला एक कृतीदल (Tack Force) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) व (३) ज्या वक्फ मालमत्तेवर अतिक्रमणे अस्तित्वात आहेत अशा प्रकरणी ती अतिक्रमणे मुक्त करुन संबंधित जमिनी वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतूदींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची वक्फ मंडळाला निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दर्यापूर (जि.अमरावती) मतदार संघातील अंजनगाव सुर्जी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाअंतर्गत आगारा करिता जागा अधिगृहित केल्याबाबत

**(४५) २५६०८ (११-०८-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती) अंजनगाव सुर्जी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाअंतर्गत

आगारा करिता जागा अधिगृहित केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगार निर्मिती करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ ला मा.परिवहन मंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दर्यापूर (जि.अमरावती) अंजनगाव सुर्जी येथे आगार निर्मिती करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) अंजनगाव स्थानकावरुन दैनंदिन ९२ फेऱ्या चालविण्यात येतात. राज्य परिवहन महामंडळाच्या आगार निर्मितीच्या धारेणानुसार दैनंदिन १०० फेऱ्या आवश्यक आहेत. त्यामुळे अंजनगांव सुर्जी येथे आगार निर्मिती करणे व्यवहार्थ नसल्याने सध्या अंजनगांव सूर्जी येथे आगार निर्मिती करणे शक्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना बसस्थानकांतून पुणे आणि मुंबईकिरता अतिजलद आणि शिवनेरी बस सुरु करण्याची मागणी अनेक वर्षापासून रखडल्याबाबत

**(४६) २५७७० (११-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना बसस्थानकांतून पुणे आणि मुंबईकिरता अतिजलद आणि शिवनेरी बस सुरु करण्याची मागणी अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी प्रवासी वाहतूकीला प्रोत्साहन मिळावे म्हणून महामंडळाने जालना येथील जाणा-या अनेक लांब जाणा-या बस बंद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी प्रवासी वाहतुकीला आळा बसण्यासाठी आणि प्रवाशांसाठी पुणे आणि मुंबई येथे अतिजलद (दोन थांबे) बसगाडया सुरु करण्यासाठी तसेच जालना बसस्थानकांतून मुंबई येथे रात्रीच्या वेळी प्रवास करण्याकरिता निमआराम आणि अतिजलद गाड्या सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :**(१), (२) व (३) जालना येथून जालना-पुणे, आफ्राबाद पुणे, परतूर-पुणे, अंबड-पुणे अशी एकूण १० नियत प्रायोगिक तत्वावर निमआराम बसेसद्वारे चालनात आणली होती. सदर सेवेत अत्यल्प प्रवासी प्रतिसाद मिळाल्यामुळे निमआराम सेवा बंद करुन सदर सेवा साध्या बसेसद्वारे सद्यस्थितीत चालनात असून लांब व मध्यम लांब पल्ल्याची कोणतीही फेरी बंद केलेली नाही.

सद्यस्थितीत जालना येथून मुंबई मार्गावर परभणी-मुंबई रात्री २२.०० वा, पुसद-मुंबई रात्री २१.३० वा यवतमाळ मुंबई सायंकाळी १७.०० वा. या फेऱ्या चालनात आहेत. जालना

विभागाच्या पुणेकरीता ३ व इतर विभागाच्या ५ अशा ८ फेऱ्या उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापूर नगरीत सद्या देवीदर्शनासठी लाखो भाविकांची गर्दी होत असतांना एसटी महामंडळाच्या स्थानकात दिवसभर गावात फिरणारी मोकाट जनावरे, भिकारी वेडे यांचा मुक्काम वाढल्याबाबत

**(४७) २५९६८ (११-०८-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर नगरीत देवीदर्शनासाठी लाखो भाविकांची गर्दी होत असतांना एसटी महामंडळाच्या स्थानकात दिवसभर गावात फिरणारी मोकाट जनावरे शिवाय भिकारी, वेडे वारंगणाचा मुक्काम वाढला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुळजापूर नगरीतील एसटी बस स्थानकाला सुरक्षा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :** (१) व (२) तुळजापूर येथे राज्य परिवहन महामंडळाची दोन बसस्थानके असून दोन्ही बसस्थानकावर तीन पाळयात प्रत्येकी एक वाहतूक नियंत्रक, तसेच ०९.०० ते १८.०० या वेळेत प्रत्येकी एक वाहतूक नियंत्रक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. दोन्ही बसस्थानकांवर सहाय्यक वाहतुक निरीक्षक, वाहतूक निरिक्षक व सहाय्यक वाहतूक अधिक्षक व आगार प्रमुख यांची नियमित देखरेख असून कर्तव्यावर असणाऱ्या वाहतूक नियंत्रकाद्वारे तसेच तुळजापूर आगाराचे सुरक्षा रक्षक व पोलीसांच्या पध्दतीने भिकारी, वेडे व मोकाट जनावरे यांना बसस्थानकावर येण्यास पतिबंध व्हावा याकरीता राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर आवश्यक ती दक्षता घेण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) उमरगा - येणेगूर व मुरुम येथील बसस्थानकांच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(४८) २६१४९ (११-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा-येणेगूर व मुरुम (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील बसस्थानकांच्या इमारतीची दुरवस्था झालेल्या कारणाने व बसस्थानकात पाणी, वीज, रस्ते आदी सुविधांचा अभाव असलेल्या कारणाने प्रवाशांची गैरसोय होत असलेबाबत व सदरच्या बसस्थानकांची दुरुस्ती

करणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ रोजी लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरगा-येणेगूर व मुरुम (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील बसस्थानकांच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत व बसस्थानकात पाणी, वीज, रस्ते आदी सुविधांचा अभाव असलेल्या प्रवाशांची गैरसोय होत असलेल्या व सदरच्या बसस्थानकांची दुरुस्ती करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :**(१) व (२) उमरगा, येणेगूर व मुरुम बसस्थानकांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत व्यवस्था तसेच बसस्थानकांवर प्रवाशांसाठी चौकशी कक्ष, तिकिट आरक्षण, स्त्री/पुरुष स्वतंत्र प्रसाधनगृहांची व विद्यार्थी पासेस इ. व्यवस्था, पुरविण्यात आली आहे.

येणगूर व मुरुम बसस्थानकातील वाहनतळ सुस्थितीत असून उमरगा बसस्थानकातील खड्डे भरण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर रेल्वे स्थानकाच्या आवारातून पूर्वेकडील जाणा-या एस.टी. बस स्थानक हटविले गेल्याबाबत

**(४९) २७२३६ (१२-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर रेल्वे स्थानकाच्या आवारातून पूर्वेकडील जाणा-या एस.टी. बस स्थानक हटविले गेल्याने मनोर परिसरातील सुमारे १०० ते १५० गावातील प्रवाशांना एस.टी.बस पकडण्यासाठी पालघर रेल्वे स्टेशन ते पालघर एस.टी.स्थानकाचे सुमारे २ कि.मी. अंतर पायपीट करावी लागत असून तसेच नाहक रिक्षा भाडे खर्चाचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे ही प्रवाशांची ओढाताण थांबविण्यासाठी पालघर रेल्वे स्टेशन जवळील एस.टी. बस स्थानक पूर्ववत करण्यात येणार आहे काय,

(२) असल्यास, पालघर रेल्वे स्टेशन जवळील एस.टी. बस स्थानक पूर्ववत करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-१०-२०१५) :**(१) व (२) एस.टी. बसस्थानक हटविण्याबाबत स्थानिक महसूल व पोलीस प्रशासनाने दंडात्मक कार्यवाही होईल असे सांगून एकतर्फी निर्णय घेतलेला आहे. सदर एस.टी. बसस्थानक पुर्ववत करण्याबाबत स्थानिक प्रशासनाकडे राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एस.टीच्या अपघातात विविध कारणामुळे होणाऱ्या मृत्यूच्या संख्येत वाढ झाल्याबाबत**

**(५०) २८२२४ (२६-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या एस.टी. अपघातात माहे एप्रिल ते मे, २०१५ या एका महिन्याच्या कालावधीत विविध कारणामुळे राज्यभरात झालेल्या अपघातात एकूण ८८ जणांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, माहे एप्रिल ते मे, २०१४ या कालावधीत एस.टी. अपघातामध्ये ९१ जणांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी शासनाने कोणती नवीन उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-१२-२०१५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) दिनांक १५.०४.२०१५ पासून राज्य परिवहन मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी पुणे येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच मे. वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोसिएशन तर्फे दिनांक ०१.०२.२०१४ पासून १ दिवसाचे सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते.

चालकांसाठी प्रत्येक विभागांमध्ये चालकाच्या सकारात्मक मानसकितेकरीता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्यांच्याद्वारे समुपदेशन केले जात आहे. तसेच प्रजापिता ब्रम्हकुमारी विश्व विद्यालयाच्या प्रशिक्षकांमार्फत आगार पातळीवर प्रशिक्षण शिबीर आयोजित करुन चालकांना त्यांचेकडून मार्गदर्शन करुन प्रबोधन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.